लोकमत


रघुनाथ माशेलकर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमाला

# सर्वसमावेशकतेसाठी गांधीयन अभियांत्रिकी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देश विकासात महत्त्वाच्या असणाऱ्या शिक्षण, आरोग्य आदी सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांमधील मागणी आणि पुरवठा यातील असमानता कमी करीत नेऊन समाजातील सर्व घटकांची सर्वसमावेशकता वाढविणे अशा समावेशी नवोन्मेषी धोरणाची देशाला गरज आहे. त्यासाठी आपल्याला 'गांधीयन अभियांत्रिकी'च्या मार्गाचा अवलंब करावा लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या विशेष ऑनलाइन व्याख्यानमालेअंतर्गत दुसरे पुष्प त्यांनी 'नवोन्मेषप्रणित गतिमान समावेशी वृद्धी' या विषयावर गुंफले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख



उपस्थित होते. समावेशी नवोन्मेष व वृद्धीसाठी 'गांधीयन अभियांत्रिकी' हा अत्यंत मूलभूत व नैसर्गिक मार्ग आहे. 'आपली वसुंधरा प्रत्येक माणसाची गरज भागेल, इतके जरूर देते; प्रत्येकाची हाव भागविण्यास मात्र ती अक्षम आहे,' हा गांधीविचार त्याचा पाया आहे. कमीत कमी संसाधनांच्या वापरातून अधिकाधिक लोकांसाठी अधिकाधिक, दर्जेदार साधन-सुविधांची निर्मिती करणे हा त्याचा गाभा आहे. त्या दृष्टीने नवोन्मेषाकडे, नवनिर्माणाकडे पाहायला हवे, असे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

## डॉ. माशेलकर म्हणाले

- शिक्षण आणि योग्य पूरक संधी यांच्या संयुक्त बळावरच आपले आणि देशाचे भवितव्य अवलंबून
- डिजिटल तंत्रज्ञानाची दरी सांधणे, समावेशन वाढविण्याची गरज
- शिक्षणाचा अधिकारही महत्त्वाचा

देशातील सामाजिक-आर्थिक असमानता आणि दारिद्र्य यांच्यावर आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मात करता येऊ शकते, याची ठोस जाणीव डॉ. माशेलकर यांनी करून दिली. त्याचे अनुसरण गरजेचे असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी स्वागत केले. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले.

लोकसत्ता

# मिलिंद चंपानेरकर, मेघा पानसरे यांना आंतरभारती अनुवाद पुरस्कार

लोकसत्ता प्रतिनिधी





**मुंबई :** साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे देण्यात येणारा मराठीतील उत्कृष्ट अनुवादासाठी सन २०१९चा बाळशास्त्री जांभेकर अनुवाद पुरस्कार डॉ. मेघा पानसरे यांना, तर सन २०२०चा हाच पुरस्कार मिलिंद चंपानेरकर यांना जाहीर झाला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक, कवी विंदा करंदीकर यांच्या जन्मदिनी हे पुरस्कार जाहीर करण्यात आले. विंदा करंदीकर यांनी या पुरस्कारासाठी आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राला दिलेल्या देणगीतून हा पुरस्कार देण्यात येतो. करोना विषाणूसाथीच्या संकटामुळे पुरस्कार जाहीर केले गेले नव्हते. आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राच्या अध्यक्षा नीरजा यांनी ही पुरस्काराची घोषणा केली. पुरस्कारांची निवड प्रफुल्ल शिलेदार, प्रा. सुनंदा महाजन, प्रा. रणधीर शिंदे आणि डॉ. नितीन रिंढे यांच्या समितीने केली.

२०१९चा भाषांतर पुरस्कार डॉ. मेघा पानसरे यांनी भाषांतरित केलेल्या 'सोविएत रशियन कथा' या लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाला, तर सन २०२०चा पुरस्कार प्रफुल्ल बिडवई लिखित 'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' या पुस्तकाच्या भाषांतरासाठी मिलिंद चंपानेरकर यांना जाहीर करण्यात आला. हे पुस्तक रोहन प्रकाशनने प्रकाशित केले आहे.

'सोविएत रशियन कथा' या पुस्तकात सुमारे १०० वर्षांच्या काळातील रशियन कथांची भाषांतरे आहेत. डॉ. मेघा पानसरे या रशियन भाषेच्या ३० वर्षांपासूनच्या अभ्यासक आहेत. त्यांनी ही भाषांतरे थेट रशियनमधून मराठीत केली आहेत.

'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' हा प्रफुल्ल बिडवईलिखित मूळ इंग्रजी ग्रंथात भारतातील डाव्या विचारांचा ऐतिहासिक आढावा आणि भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्यात आला आहे. हा ग्रंथ मिलिंद चंपानेरकर यांनी मराठीत आणला आहे.

24 AUG 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीयन अभियांत्रिकीनेच देशाची प्रगती

## डॉ. रघुनाथ माशेलकर; शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात ऑनलाईन व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : अत्याधुनिक तंत्रज्ञान बनवून दारिद्र्यात पिचलेल्या व्यक्तींसाठी सुयोग्य वापर करणे हे देशातील तरुणांसमोरचे खरे आव्हान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी आज येथे केले. सर्वसमावेशक धोरणाने देशाच्या विकासाचे चक्र गतिमान होईल, असा आशावाद व्यक्त करत त्यांनी देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी गांधीयन अभियांत्रिकीच्या मार्गाचा अवलंब करावा लागेल, असे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे झालेल्या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेंतर्गत दुसरे पुष्प गुंफताना 'इनोव्हेशन लेड ॲक्सिलरेटेड इन्क्लुजिव्ह ग्रोथ' (नवोन्मेषप्रणित गतिमान समावेशी वृद्धी) विषयावर ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

डॉ. माशेलकर म्हणाले, ''समावेशी नवोन्मेष व वृद्धीसाठी गांधीयन अभियांत्रिकी मूलभूत व नैसर्गिक मार्ग आहे. आपली वसुंधरा प्रत्येक माणसाची गरज भागेल इतके जरूर देते; प्रत्येकाची हाव भागविण्यास मात्र ती अक्षम आहे, हा गांधी विचार त्याचा पाया आहे आणि कमीत कमी संसाधनांच्या वापरातून अधिकाधिक लोकांसाठी अधिकाधिक व दर्जेदार साधन-सुविधांची निर्मिती करणे (MLM- More from Less for More and More) हा त्याचा गाभा आहे. श्रीमंतधार्जिणे तंत्रज्ञान बनविणे सोपी बाब आहे. दारिद्र्यातील माणसांसाठी तंत्रज्ञानाची निर्मिती करून त्यांना आत्मप्रतिष्ठा प्रदान करणाऱ्या युवाशक्तीची देशाला गरज आहे.''

ते म्हणाले, ''भारत १३० अब्ज विचार करणाऱ्या डोक्यांचा देश म्हणून ओळखला जाणे महत्त्वाचे वाटते. आजवर केवळ आपण जोडणी आणि जुळणी (असेंबल) करणाऱ्यांचा देश आहोत. त्याऐवजी नवसंशोधन करणाऱ्यांचा देश व्हायला हवे. भारताने शोध-संशोधन या मार्गाने 'मेक इन इंडिया' मोहीम यशस्वी करावी.''

### दरमहा साठ रुपयांची शिष्यवृत्ती



राष्ट्रपती के. आर. नारायणन गरीब दलित कुटुंबातून आले. उच्च शिक्षणासाठी त्यांना टाटा फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली. त्या बळावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून राष्ट्रपतीपदापर्यंत झेप घेतली. माझ्या घरची परिस्थितीही बेताची होती. मलाही टाटा फाउंडेशनची दरमहा साठ रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली, म्हणून मी माझे शिक्षण पूर्ण करून आयुष्यात काही तरी भरीव करू शकलो, या शब्दांत डॉ. माशेलकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे झालेल्या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेत बोलताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर.

अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी स्वागत केले.

### डॉ. माशेलकर म्हणतात..

- शिक्षण आणि योग्य पूरक संधी यांच्या बळावरच देशाचे भवितव्य
- डिजिटल तंत्रज्ञानाची दरी सांधणे व समावेशन वाढविण्याची गरज
- भावी पिढी सकारात्मक व संतुलित बनविणे आवश्यक
- युवकांनी समावेशी समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने योगदान द्यावे

24 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत नवसंशोधकांचा देश झाला पाहिजे

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन : विद्यापीठात अर्थशास्त्र विभागच्यावतीने व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

समावेशी नवोन्मेष व वृद्धीसाठी 'गांधीयन अभियांत्रिकी' हा अत्यंत मूलभूत व नैसर्गिक मार्ग आहे. १३० कोटींच्या खाणाऱ्या तोंडांचा देश म्हणण्यापेक्षा १३० अब्ज विचार करणाऱ्या डोक्यांचा देश म्हणून ओळखला जावा. केवळ जोडणी आणि जुळणी करणाऱ्यांपेक्षा नवसंशोधन करणाऱ्यांचा देश व्हायला हवा; भारताने आता शोध-संशोधनाच्या माध्यमातून 'मेक इन इंडिया' मोहीम यशस्वी करावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत 'इनोव्हेशन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. माशेलकर.**

लेड ॲक्सिलरेटेड इन्क्लुजिव्ह ग्रोथ' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. माशेलकर पुढे म्हणाले, देशाच्या विकासात शिक्षण, आरोग्य आदी सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांमधील मागणी व पुरवठा यातील असमानता कमी करावी. समाजातील सर्व घटकांची सर्वसमावेशकता वाढविणे अशा समावेशी नवोन्मेषी धोरणाची देशाला गरज आहे. त्यासाठी 'गांधीयन अभियांत्रिकी'च्या मार्गाचा अवलंब करावा. देशाने नवोन्मेषाच्या बाजूने उभे राहायला हवे. त्यासाठीची भौतिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक बांधणी करण्याबरोबरच उत्तम दर्जाच्या शैक्षणिक व संशोधन संस्था, आणि भरीव भांडवल प्रदात्यांची गरज आहे. डिजीटल तंत्रज्ञानाची दरी सांधणे, डिजीटल समावेशन वाढविणे गरजेचे असले तरी शिक्षणाचा अधिकार असणेही महत्त्वाचे आहे. योग्य शिक्षण पद्धत आणि मूल्यसंवर्धन देशाची भावी पिढी सकारात्मक व संतुलित बनविण्यासाठी महत्वाची आहे. युवकांनी समाजातल्या वंचित, शोषित समाजाप्रती आस्था, सहृदयतेच्या बळावर देशातील सामाजिक-आर्थिक विषमता दूर होऊन समावेशी समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने योगदान द्यावे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानावरुन म्हणाले, देशातील विविध घटकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्तर शोधण्याचे काम तरुण पिढी करीत आहे. देशातील सामाजिक-आर्थिक असमानता व दारिद्र्य यांच्यावर आधुनिक डिजीटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मात करता येऊ शकते. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी स्वागत व परिचय करुन दिला.